# जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये सायबर सुरक्षा उपक्रम

संचार वृत्तसेवा

उत्तर सोलापूर, दि. ८- तालुक्यातील कोंडी येथील जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश मीडियम स्कूल व शिवसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल, क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.



या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थिनी मालती जाधव व मानसी शेळके यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आजच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दलची उदाहरणांसह माहिती दिली. अशा प्रकारच्या फसवणुकी होऊ नयेत म्हणून त्याबद्दल सर्वांनी काळजी घेण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करून घेणे, व्हॉट्सअ‍ॅप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्राँग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी. तसेच आपली माहिती सुरक्षित ठेवणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. मोबाइल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिरिक्त वापर न करता योग्य त्या कामासाठी वापर करावा. मोबाइल वापरत असताना पालकांच्या परवानगी घ्यावी. यासाठी त्यांनी मुलांना शपथ घेण्यास सांगून विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरेही दिली.

या कार्यक्रमास प्राचार्या सुषमा नीट यांच्यासह प्रशालेतील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अर्चना औराडे यांनी केले तर आभार कोमल कांबळे यांनी मानले.